# जिल्हा व सत्र न्यायालय जालना

## जा ही र नि वि दा

जिल्हा व सत्र न्यायालय, जालनासाठी ई— कमेटी स्पेशल ड्राईव्ह ट्रेनिंग ॲन्ड आउटरीच प्रोग्राम २०२४—२०२५ अन्वये जिल्हा न्यायालयातील कर्मचारी यांचे प्रशिक्षणकामी खालील नमुद वस्तु खरेदी करावयाच्या आहेत. तरी या कामी ज्या पुरवठाधारकांना स्वारस्य असेल त्यांनी त्यांची दरपत्रके बंद लिफाफ्यात जिल्हा व सत्र न्यायालय जालना यांना दिनांक १७/१०/२०२४ पर्यंतच्या कार्यालयीन वेळेपर्यंत म्हणजेच सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत सादर करावी अथवा समक्ष आनुन दयावी त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

| No. | Description Of Items | Qty |
|---|---|---|
| 1 | Ahuja Podium Pa Lectern System With 2 Wireless Mic, 1 Podium Mic, Speaker, Bluetooth, In-Built Rec, Usb, Sd Card & Reading Light | 1 |
| 2 | Ahuja 2 Wireless Tie Clip And Headband Microphone | 1 |
| 3 | Wireless Presenter Laser Power Point Ppt Presenter Slide Changer Controller With Usb Receiver For Windows And Linux System Clicker For Keynote/Ppt/Google Slides | 1 |
| 4 | Double Tripod Stand Projector Screen Size (7 Ft. (Width) X 5 Ft. (Height) - ) Diagonal In 4:3 Aspect Ratio Supporting Remode Control Active 3d, 1080p, Ultra 4k, Technology, Ultra Hd. | 1 |

**सर्वसाधारण अटी**

१. दरपत्रकात उक्त तक्त्यात नमूद कंपनीचेच व त्याच क्षमतेचे असलेले साहित्याचेच दर सादर करावीत.

२. दरपत्रक स्विकृत केल्यावर व आदेश दिल्यानंतर सदरचे साहित्य त्वरीत पुरवावे लागेल व प्रस्तापित करुन द्यावे लागेल. सदरील साहित्य हे जाहिर निविदेत सादर केलेल्या विवरणाप्रमाणेच असावे लागेल व त्याचा हा दर्जा उत्कृष्ट आणि उच्च प्रतिचा असावा नसल्यास सदरील साहित्य स्विकारले जाणार नाही.

३. दरपत्रके मंजूर झाल्यावर सदरचे साहित्य जिल्हा व सत्र न्यायालय जालना येथे आदेश दिल्यानंतर तात्काळ स्वखर्चाने पोहचवून आणि प्रस्थापित करुन द्यावे लागतील.

४. दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार हा मा. खरेदी समिती, जिल्हा न्यायालय जालना यांच्याकडे राखुन ठेवण्यात आलेला आहे. दरपत्रक भरतांना दर अंकात व अक्षरी असे दोन्ही प्रकारे भरावेत.

५. सदरील साहित्य जिल्हा व सत्र न्यायालय जालना येथे पुरविल्यानंतर सदरील देयकाची अदायगी ही महाराष्ट्र न्यायीक प्रशिक्षण संस्था, उत्तान जि ठाणे यांच्या मार्फत होणार असल्याने उधारीच्या देयकासोबत आपल्या फर्म/एजन्सी चा राष्ट्रीयकृत बॅंकेचा रद् केलेला धनादेश व बॅंक पासबुक ची झेरॉक्स प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

६. दरपत्रके सादर करणा—या पुरवठादाराकडे ( PAN/GST/CST ) नंबर असणे आवश्यक आहे.

७. सदर जाहिर निविदेत कोणत्याही क्षणी कोणत्याही कारणाशिवाय बदल, दुरूस्ती किंवा सुधारणा करण्याचा अधिकार जिल्हा न्यायालयाने राखून ठेवलेला आहे.

८. दरपत्रक भरतांना सर्व करासह दरपत्रक ( GST/CST सह) भरावे. तसेच बिलाची रक्कम अदा करतांना नियमानुसार टी.डी.एस. कपात करण्यात येईल.

९. देयक अदा केल्यानंतर देयक मिळाल्याबाबतची पावती जिल्हा न्यायालयास सादर करावी लागेल.

१०. उपरोक्त वस्तु खरेदी केल्यानंतर सदरील देयकाची रक्कम ही पुरवठादाराला परस्पर मा. सह. संचालक, महाराष्ट्र न्यायीक प्रशिक्षण केंद्र यांचेकडून त्यांचे बॅंक खात्यावर जमा करण्यात येईल.

११. दरपत्रकातील दर दिनांक ३१/१२/२०२४ अखेर कार्यरत राहतील.

१२. नमुद वस्तुंचा पुरवठा आदेश देउनही मुदतीत न केल्यास पुरवठा आदेश रद् करण्याचा अधिकार मा. खरेदी समिती, जिल्हा न्यायालय जालना यांच्याकडे राहिल.

जिल्हा व सत्र न्यायालय, जालना
दिनांक — 15.10.24

प्रबंधक 15/10/24
जिल्हा व सत्र न्यायालय
जालना.

प्रति माहिती करीता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दी करीता .

१. मा. जिल्हा व सत्र न्यायालय, जालना यांच्या संकेतस्थळावर
२. बेलिफामार्फत कार्यालयाच्या सुचना फलकावर डकविण्यासाठी